# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५**

## गृहनिर्माण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: क्यू-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**बाब क्रमांक: २७६, रूपये:- ८,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | ९३५ | १० | सांगोला शहराचा विकास झपाट्याने होत असून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत अनेकाना परवडणारी घरे उपलब्ध करून दिली जातात परंतु सदर घरांचे बांधकाम करण्यासाठी अनुदानाची रक्कम २.५ लाख रु. अनुदान दिले जाते परंतु सदर चे अनुदान हे तुटपुंजे असून त्याची पर्यादा ५ लाख रु. करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. करण्याबाबत |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (२) | ९५० | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील दादासाहेब फाळके चित्रनगरी येथील झोपडपट्टी मोठ्या प्रमाणात मागील 50 ते 60 वर्षापासून वास्तव्यस असून सदर झोपडपट्टी चे पुनर्वसन होणे अत्यंत आवश्यक आहे याबाबत शासनाकडे झोपडपट्टी धारकांकडून वारंवार मागणी करण्यात येणे व अद्याप त्या मागण्या पूर्ण न होणे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ९५१ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील आरे येतील वसाहती मध्ये मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी धारक हे जवळपास अनेक वर्षांपासून वास्तव्यास असून सदर झोपडपट्टी धारकांनी शासन दरबारी पुनर्वसनाबाबत निवेदनाद्वारे मागण्या करून अद्याप पूर्ण न होणे त्या मागण्यांना शासनाकडून कोणता प्रतिसाद न मिळणे ही चिंतेची बाब असून सदर झोपडपट्टी धारकांना लवकरात लवकर त्यांचे पक्के घर देण्याचे नियोजन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ९६० | १० | जोगेश्वरी पूर्व मतदारसंघातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सर्वोदय गौरव हॉटेलपर्यंतच्या रस्त्यांमध्ये बाधित पुनर्वसन झोपडपट्टी धारकांना उपलब्ध करून देण्याकरिता सदर रहिवाशांनी अनेक वेळा सदर विभागाकडे मागणी करणे, विभागाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केलेले असल्याचे दिसून येत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५) | ९६५ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील महाराज नगर येथील तिवारी चाळा पुनर्वसन संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत तिवारी चाळ यांचे पुनर्वसन शासकीय जागेमध्ये करण्यात यावे याकरिता स्थानिकांची मोठ्या प्रमाणात मागणी असून अद्याप महानगरपालिका व गृहनिर्माण विभाग यांनी कोणती कारवाई केली नसल्याने याबाबत जनतेमध्ये पसरलेला संबंध दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ९६६ | १० | जोगेश्वरी पूर्ण मतदारसंघातील महाकाली गुफा येथील शेकडो झोपडीधारकांना पुनर्वसनाबाबत शासनाकडे इमारतिच्या माध्यमातून करण्याच्या करिता येसऱ्याकडे निवेदन व पत्रव्यवहार करणे यात्रेच्या माध्यमातून सदर महाकाली गुफा येथील झोपडपट्टी धारकांना कोणत्याही प्रकारचे पुनर्वसन करण्याबाबतचे कारवाई केल्या नसल्याने जनतेमध्ये पसरलेला संभ्रम दूर करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ९६८ | १० | रॉयल फाम येथील मयूर नगरच्या झोपडपट्टी इमारती अत्यंत धोकादायक होऊन जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे त्याबद्दल शासनाकडे वारंवार झोपडपट्टी पुनर्वसन करण्यासंदर्भात मागण्या करूनही शासनाने कोणती सकारात्मक भूमिका दर्शवली नसल्याने याबाबत जनतेमध्ये पसरलेले नैराश्य याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ९७१ | १० | बांदेलकर वाडी येथील अनेक वर्षापासून झोपडपट्टी पुनर्वसन होणे हे अत्यंत आवश्यक असतानाही तिथल्या पुनर्वसनासंदर्भात एसआरएच्या माध्यमातून कोणतीही काम पूर्ण करण्यात आले नसल्याने एसआरच्या माध्यमातून जनतेमध्ये शासनाच्या बद्दल नैराश्य पसरलेले असल्याने सदर पुनर्वसनाबाबत शासनाकडे सातत्याने मागण्या करत असून त्या मागण्या पूर्ण होत नसल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ९७३ | १० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील मॉडर्न बेकरी मधील सर्वेक्षण पूर्ण झालेल्या झोपडपट्टीच्या पुनर्वसनाबाबत शासनाकडे जनतेकडून होणारे मागणी लक्षात घेता तातडीने झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्यासाठी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ९७५ | १० | जोगेश्वरी पूर्व मतदार संघातील आरे येतील वसाहती मध्ये मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी धारक हे जवळपास अनेक वर्षांपासून वास्तव्यास असून सदर झोपडपट्टी धारकांनी शासन दरबारी पुनर्वसनाबाबत निवेदनाद्वारे मागण्या करून अद्याप पूर्ण न होणे त्या मागण्यांना शासनाकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे ही चिंतेची बाब असून सदर झोपडपट्टी धारकांना लवकरात लवकर त्यांचे पक्के घर देण्याचे नियोजन करण्याबाबत याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (११) | ९१४ | १० | MHADA ही सर्वसामान्य, मध्यमवर्गीय, निम्नवर्गीय कुटुंबांसाठी परवडणारी घरे पुरवणारी राज्याची महत्वाची संस्था असणे, त्यानुसार साकोली, लाखनी व लाखांदूर मध्ये आजपर्यंत एकही माडा (MHADA) प्रकल्प नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: क्यू-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**बाब क्रमांक: २७७, रूपये:- ११,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (१२) | ८९५ | १०० | मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासादरम्यान संरक्षित बांधकामाच्या पात्रतेकरीत १९६२ पुर्वीचे पुरावे ग्राह्य धरले जातात. त्यामुळे कर भरणारे अनेक रहिवाशी अपात्र ठरत आहेत. मुंबईतील झोपडट्टी पुनर्विकास प्रकल्पामध्ये संरक्षित बांधकाम पात्रतेकरीता २०११ पर्यंतची कालमर्यादा ठेवली आहे. त्यामुळे अनेक अनधिकृत झोपड्या बनवून राहणारे रहिवाशी पात्र होतात, व त्यांना पुनर्विकास प्रकल्पामध्ये नवीन सदनिका उपलब्ध होते. उपकरप्राप्त इमारतीच्या प्रकल्पामध्ये संरक्षित बांधकामाची कालमर्यादा १९६२ पुर्वीची असल्याने गेल्या ५० वर्षापासून कर भरणारे अनेक रहिवाशी अपात्र होतात व त्यांना घरापासून वंचित रहावे लागते.मुंबई विकास नियंत्रण नियमावली, २०३४ अस्तित्वात आले आहे. तरी देखील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पामध्ये ५० ते ६० वर्षापूर्वीची पात्रतेची कालमर्यादा का ठेवण्यात आली आहे, या कालामर्यादेमुळे मुंबईतील अनेक करदात्या रहिवाश्यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे शासनाने उपकरप्राप्त इमारतीच्या प्रकल्पातील संरक्षित बांधकामाच्या पात्रतेकरीता असलेली कालमर्यादा शिथील करुन ती २००० पर्यंत करण्यात यावी. याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ८९६ | १०० | मुंबईतील 56 म्हाडा वसातीच्या पुनर्विकासाची योजना सरकारने सुरु केली आहे. या पुनर्विकासादरम्यान म्हाडाच्या माध्यमातून शासनाला हजारो सदनिका प्राप्त होणार आहेत. शासनाला प्राप्त होणा-या सदनिका मुंबईतील गिरणी कामगारांना आरक्षित ठेवाव्यात. त्यामुळे गेली अनेक वर्ष घराच्या प्रतिक्षेत असलेल्या गिरणीकामगारांच्या मागणीनुसार त्यांना मुंबईत घर उपलब्ध करुन देता येईल. याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ९११ | १०० | मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्तीची मर्यादा रु.4000/- प्रती चौरस मीटर इतकी आहे. ती वाढवून रु.5000/- प्रती चौरस मीटर करण्याची आवश्यकता आहे. दुरुस्ती मंडळाच्या वतीने उपकरप्राप्त इमारतीची दुरुस्ती रु.3000/- प्रती चौरस मीटर इतक्या मर्यादेत केली जाते. त्यामुळे इमारतीची पूर्ण दुरुस्ती होत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नाही. त्यामुळे अशा इमरती दिवसेंदिवस अतिधोकादायक होत आहेत. त्यामुळे उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्तीची मर्यादा रु.5000/- प्रती चौरस मीटर इतकी करावी व त्याकरीता शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ९१२ | १०० | मुंबईत ३८८म्हाडा पुर्नरचित इमारती असून त्यातील अनेक इमारती धोकादायक अवस्थेत आहेत. वारंवार छत कोसळून दुर्घटना घडत आहेत. या इमारतींच्या दुरुस्तीकरीता दुरुस्ती मंडळाकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे अनेक इमारतीच्या दुरुस्तीचे काम रखडलेले आहे. त्यामुळे शासनाने म्हाडाच्या पुर्नरचित इमारतीच्या दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ९१३ | १०० | मुंबईतील विविध विकासकामे व उपकरप्राप्त इमारती, म्हाडा पुर्नरचित इमारती यांची दुरुस्ती म्हाडाच्या विविध मंडळाच्या माध्यमातून करण्यात येते. म्हाडाकडून सदर कामांसाठी कंत्राटदारांनी नियुक्ती करण्यात येते. कंत्राटदारांनी केलेल्या कामांची कोट्यावधी रुपयांची बिले गेल्या काही काळापासून थकीत आहेत. त्यामुळे कंत्राटदार नवीन कामे करण्यास नकार देत आहेत. कंत्राटदाराच्या या भूमीकेमुळे विविध प्रकल्पांची कामे रखडलेली आहेत. त्यामुळे नागरीकांना विविध विकासकामांपासून व इमारतीच्या दुरुस्तीपासून वंचित रहावे लागत आहे. शासनाने याबाबत निर्णयात्मक कार्यवाही करुन म्हाडाची विकासकामे करणा-या कंत्राटदाराची थकीत असलेली बिले अदा करण्याकरीता तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. आदित्य ठाकरे** |
| (१७) | ९२९ | १० | बी.डी.डी. चाळ पुनर्विकास हा महाविकास तत्कालीन सरकारच्या कार्यकाळात सुरू करण्यात आलेला राज्यातील महत्वाकांक्षी आणि लोककल्याणकारी प्रकल्प आहे. या प्रकल्पातील २५०० हून अधिक रहिवाशीचा समावेश असून त्यांना आधुनिक व सुसज्ज घरे देण्याचे कार्य वेगाणे सुरू असतांनाही पुनर्विकासाच्या काळात सरकारकडून देण्यात येणारे प्रतिमहिना रु.२५,०००/- इतके भाडे अनुदान सध्याच्या परिस्थितीत अपुरे ठरत असणे, मुंबईतील वाढते घरभाडे आणि महागाई लक्षात घेता, नागरिकांना मोठा आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. याकरिता बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील सर्व भाडेकरूना दिले जाणारे भाडे अनुदान तातडीने रु.४०,०००/- प्रतिमहिना इतके करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ९३० | १० | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात सुमारे १४,००० पेक्षा अधिक पागडी/सेस इमारतीस्थित असणे, मुंबई शहरात हजारो रहिवाशी आजही उपकरप्राप्त (पागडी) |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | इमारतीमध्ये 70 वर्षाहून अधिक जुन्या सी। वर्गातील अतिधोकादायक १९४० पूर्वी बांधलेल्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असलेल्या इमारतीमध्ये वास्तव्य करत असून, त्या कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत असणे, मात्र मालक व भाडेकरू यांच्यातील वाद, तसेच एकसमान पुनर्विकास धोरणाचा अभाव, यामुळे या इमारतीचा पुनर्विकास अद्यापही रखडलेले असणे, परिणामी रहिवाशांना असुरक्षित व अमानवी परिस्थितीत राहण्यास भाग पाडले जात असणे, परिणामी रहिवाश्यांमध्ये पसरलेली नाराजी, त्यामुळे या इमारतीच्या पुनर्विकासासाठी इमारतीचे वय" हा एक साधा व स्पष्ट निकष असण्याची आवश्यकता, या बाबत सन १९६५ पूर्वीच्या सर्व पागडी/सेस इमारती, त्या जोर्ण अवस्थेत असोत वा नसोत, यांच्यासाठी ठराविक कालमर्यादा निश्चित करण्याची आवश्यकता, त्याकरिता बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकासाचा आदर्श समोर ठेवण्याची गरज, सेस/पागडी इमारतीमध्ये राहणाऱ्या लाखो मुंबईकरांना दिलासा देण्यासाठी एक नवीन, स्पष्ट, सर्वसमावेशक व पारदर्शक गृहनिर्माण धोरण जाहीर करावे, पुनर्विकास धोरण निश्चीत होईपर्यत कोणतीही कारवाई थांबवावी, त्रुटी पूर्ण म्हाडा एस.ओ.पी तात्काळ रदद करुन पागडी इमारतीचा पुर्ण विकास मार्गी लावण्याची नितांत आवश्यकता, यासंदर्भात लोकप्रतिनिधीनी संबंधीत मंत्री, तसेच उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हाडा यांच्याकडे दि.21/08/2025 रोजी केलेला पत्रव्यवहार, पत्राच्या अनुषंगाने अदयाप कोणतीच कार्यवाही न होणे, 1940 पूर्वीच्या सर्व उपकर प्राप्त (पागडी) मालमत्तांच्या पुनर्विकासासाठी एक नवीन स्पष्ट सर्वसमावेशक व पारदर्शक शासकीय ठराव (G.R) जारी करुन पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करावा आणि रहिवाशांना सुरक्षित, सन्माननीय आणि आधुनिक निवासाची खात्री करुन देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१९) | ९३६ | १० | सांगोला, जी. सोलापूर येथील इंदिरा नगर व संजय नगर येथील झोपडपट्ट्या सन १९८० पासून अस्तित्वात असून सदर झोपडपट्ट्या ह्या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जागेवर वसलेल्या असून सांगोला नगर परिषदेस महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा अधिनियम सन १९७१ हा अधिनियम लागू होत नसल्यामुळे येथील झोपडपट्टीधारक मुलभूत योजना पासून वंचित राहत आहेत. तरी इंदिरानगर व संजय नगर येथील झोपडपट्ट्याना महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा अधिनियम लागू करून सदर झोपडपट्ट्या संरक्षित झोपडपट्टीची अधिसूचना काढून घोषित कराव्यात, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (२०) | ८९८ | १० | सर्वसामान्यांना कच्च्या घरातून पक्क्या घरात जाण्यासाठी पंतप्रधान घरकुल आवास योजना शासनाकडून राबविण्यात येत असणे, या योजनेत लाभार्थ्यांना १ लाख २० हजार रूपये अनुदान देण्यात येणे, परंतु घरकुल बांधकामासाठी लागणाऱ्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | साहित्याचे भाव दामदुप्पटीने वाढल्याने घरकुल बांधकामासाठी पाच लाख रूपयांहुन अधिक खर्च येणे, त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना घरकुल मंजूर होऊन सुध्दा घरकुलाचे बाधंकाम प्रलंबित असणे, घरकुल बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याचे भाव दामदुप्पटीने वाढल्याने पंतप्रधान घरकुल आवास योजनेतील अनुदान किमान पाच लाख रूपये करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (२१) | ८७९ | १०० | विक्रोळी विधानसभा क्षेत्रातील टागोर नगर वसाहतीतील 7 इमारतींचा पुनर्विकास अदयाप रखडलेला असून इमारती अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने इमारतीतील सदनिकेमधील छताचा भाग कोसळत असल्याचे निदर्शनास आले आहे . या धोकादायक इमारतीमध्ये अदयापी ९९४ कुटुंब जीव मुठीत घेऊन वास्तव्य करीत आहे.या इमारतीमधील इमारत क्रमांक ४११ या धोकादायक इमारतींच्या चौथ्या मजल्यावरील सज्जा कोसळून दिनांक १९ डिसेंबर ,२०२४ रोजी घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता शासनाने तातडीने या इमारतीची पाहणी करुन तात्काळ इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ८८१ | १०० | कन्नमवार नगर व टागोर नगर या भागात मोठया प्रमाणात इमारतींचा पुर्नर्विकास सुरु असून त्यापैकी बहुतेक इमारतींना व्ही.पी कोटा व प्रोरेटा मिळाला नसल्याचे पुर्नर्विकासास अडचणी येत आहेत .मा.उच्च न्यायालयाच्या निवाडयानुसार 50 मीटर बफरझोन बाधित इमारतींना सीआरझेड-२ मध्ये वर्गीकरण करुन त्यांना पुर्नर्विकासास परवानगी दयावी असे एम.सी.झेड.एम.ए ने कडून निर्देशित करण्यात आले आहे .त्याकरिता कन्नमवार नगर व टागोर नगर येथील वंचित इमारतींना व्ही.पी कोटा व प्रोरेटा मिळण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वरुण सरदेसाई** |
| (२३) | ८८२ | १०० | वांद्रे (पूर्व), भारतनगर येथील पी.एम.जी.पी. टाटा कॉलनी मधील रहिवाशांच्या घरांचे निष्कासन विकासाकाकडून केले गेले असणे, या रहिवाशांच्या संदर्भात विकासकाने PAAA करार नोंदणीकृत करणे बंधनकारक असणे, परंतु म्हाडाच्या अखत्यारीतील इमारतीमधील रहिवासी असलेले एकूण ७१२ घरामालाकांसोबत विकासकाने PAAA करार नोंदणीकृत केलेले नसणे, सदर बाबत राहिवाशांसोबत विकासकास PAAA करार नोंदणीकृत करणेकरीता स्पष्ट आदेश देण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (२४) | ८९२ | १०० | म्हाडा मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील सर्वच ५६ वसाहतींतील सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाढीव सेवा शुल्क आकारण्याबाबत म्हाडाने निर्णय घेतल्यानंतर रहिवाशांवर या सेवा शुल्काचा मोठा बोजा निर्माण झालेला असणे, वांद्रे (पूर्व) येथील गांधीनगर, खेरनगर व भारतनगर येथे म्हाडा वसाहतीमधील रहिवाशांना हे वाढीव |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सेवा शुल्क भरणे त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला असता शक्य नसणे, सदर बाबत वाढीव सेवा शुल्क माफ करण्याची घोषणा तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी केलेली असणे, प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारचा शासन निर्णय अद्याप न निघाल्याने या सर्व म्हाडा रहिवाशांसमोर मोठी समस्या निर्माण झालेली असणे, म्हाडा मुंबई मंडळाने जबरदस्तीने लागू केलेले वाढीव सेवा शुल्क तात्काळ माफ करण्याबाबत आदेश देण्याची आवश्यकता, तसेच सदर वाढीव सेवा शुल्क माफ करण्याबाबत शासन निर्णय प्रसिद्ध करणेबाबत शासनाची कार्यवाही व भूमिका, याकडे होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. महेश सावंत** |
| (२५) | ९३९ | १० | माहीम मतदारसंघातील सर्व प्रकल्प बाधित नागरिकांना त्यांच्या माहीम मतदारसंघांमध्येच आपली हक्काची घरे मिळावीत याकरिता जास्तीत जास्त प्रकल्प बाधित नागरिकांकरिता प्रकल्प उभारावेत. प्रभादेवी येथील श्री साई सुंदर नगर या ठिकाणच्या नागरिकांना रिकाम्या असलेल्या प्रकल्पातील इमातींमध्ये स्थलांतरित करून तंत राहण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : ९ डिसेंबर, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) गृहनिर्माण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर